





दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com



**1,22,570**

डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**





● वर्ष : ०२ ● अंक : २४८ ● पुणे ● बुधवार, दि. १३ ऑगस्ट २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313


## विद्यार्थ्यांनो मराठी शिकण्याचा प्रयत्न करा

### डॉ. निलम गोऱ्हे : एमआयटी एडीटी' विद्यापीठाचा १०वा स्थापना दिन उत्साहात साजरा




> **मी कुठल्याही आयआयटीमध्ये घडलो नाही, फक्त मला गणित, रसायनशास्त्र आणि भौतिकशास्त्राची प्रचंड आवड होती. त्यामुळे, प्रतिभावान वैज्ञानिक केवळ, आयआयटीत घडतात असे नाही. विद्यार्थ्यांचा पाया पक्का असेल, त्याच्यात समस्यांचे उत्तर शोधण्याची सर्जनशीलता असेल तर एमआयटीसारख्या संस्थांमधूनही भविष्यात चांगले संशोधक घडतील.**
>
> **- पद्मश्री डॉ. नागराजन वेदाचलम वैज्ञानिक, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो)**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

मराठी भाषा ही अत्यंत प्राचीन आणि सांस्कृतीकदृष्ट्या समृद्ध आहे. तिला हजारो वर्षांचा वारसा असून, मराठी साहित्य, नाटकं, गाणी अत्यंत विलोभनीय आहेत. त्यामुळे परराज्यातून शिक्षणासाठी महाराष्ट्रात येणाऱ्या विद्यार्थ्यांनी मराठी भाषा शिकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. महाराष्ट्रीयन जेवण सर्वांनाच आवडते, त्यामुळे मराठी माणसाशी, मराठीत बोलल्यास तो दोन घास अधिक प्रेमाने वाढतो, अशी कोटी महाराष्ट्र विधानसभेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अस्खलित इंग्रजी भाषेत केली आणि येथील स्वामी विवेकानंद सभामंडपात हजारो विद्यार्थ्यांकडून टाळ्यांचा एकच कडकडात झाला.

डॉ.गोऱ्हे येथील एमआयटी आर्ट, डिझाईन व टेक्नॉलॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणेच्या १०व्या स्थापना दिन कार्यक्रमात बोलत होत्या.

यावेळी, व्यासपीठावर, भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे (इस्रो) वैज्ञानिक पद्मश्री डॉ.नागराजन वेदाचलम, मालवीय राष्ट्रीय इन्स्टिट्यूट ऑफ टॅक्नॉलॉजीचे (एमएमआयटी) संचालक प्रा.डॉ.एन.पी. पाधी, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष तथा प्र. कुलपती प्रा.डॉ.मंगेश कराड, कुलगुरू प्रा.डॉ.राजेश एस., इस्कॉन पुणेचे प्रमुख राधेशाम, कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनीता कराड, प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ.महेश चोपडे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

डॉ.पाधी यावेळी एमआयटी एडीटी विद्यापीठाला एक दशक पूर्ण केल्याबद्दल शुभेच्छा दिल्या. तसेच, सध्या अंतराळात पाठवण्यात आलेल्या मायक्रो सॅटलाईट आयआयटी शिवाय इतर ठिकाणी शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांनी बनवलेल्या आहेत. भारतातील विद्यार्थ्यात प्रचंड प्रतिभा आहे, त्यामुळे त्यांनी स्वतः विश्वास ठेवत सर्वस्व अर्पण केल्यास त्यांना कुठल्याही क्षेत्रात यश नक्कीच मिळेल.

याप्रसंगी बिलींग विभागाचे प्रमुख, प्रा.प्रदीप प्रभू यांना विद्यापीठाच्या जडणघडणीतील बहुमुल्य योगदानाबद्दल जीवनगौरव पुरस्काराने गौरविण्यात आले. त्यांच्यासह डॉ.अतुल पाटील, डॉ.राजशेखर राठोड, प्रा.तुषार चौरुशी, डॉ.शालिनी गर्ग, संदीप जाधव, यशस्विनी पिसोलकर यांचाही पुरस्कारांनी गौरव करण्यात आला.

विश्वशांती प्रार्थना सुरुवात तर राष्ट्रगीताने समारोप झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.राजेश एस., यांनी तर आभार डॉ.पुजेरी यांनी मानले. तर सूत्रसंचालन प्रा.श्रद्धा वाघटकर, प्रा.स्वप्निल शिरसाठ, डॉ.अशोक घुगे यांनी केले.

डॉ.मंगेश कराड यावेळी म्हणाले, प्रा. डॉ.विश्वनाथ कराड यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयटी एडीटी विद्यापीठाने एक दशक पूर्ण केले आहे. 'नॅक'कडून 'अ' श्रेणी मिळाल्यानंतर आता एमआयटी एडीटी व्हिजन-२.० ची सुरुवात झाली आहे. आता जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय मान्यता मिळविणे, एआयमध्ये नवोपक्रम, मुक्त आणि दूरस्थ शिक्षण (ओडीएल), देशात आणि देशाबाहेर कॅम्पस स्थापन करणे आदी प्रयत्न आपण करणार आहोत. त्यामुळे, भविष्यातही एमआयटी एडीटी विद्यापीठ यशाची नवनवीन शिखरे पादक्रांत करेल याचा मला विश्वास आहे.



नऱ्हेतील भगिनींची एकच हाक

## "भूपेंद्रभाऊ नगरसेवक होऊ दे!"

### हजारो महिला भगिनींनी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांना बांधली राखी

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

रक्षाबंधनाचा पवित्र सण आणि सामाजिक बांधिलकीचा संगम असा देखणा सोहळा नऱ्हेमध्ये पार पडला. कृष्णाई नगर येथील भूपेंद्र मोरे जनसंपर्क कार्यालयात हजारो महिला-भगिनींनी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांना राखी बांधत आपुलकीचा धागा बांधला आणि "भूपेंद्र भाऊ नगरसेवक होऊ दे" अशी मनापासून इच्छा व्यक्त केली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महिलांची प्रचंड गर्दी मोरे यांना राखी बांधण्यासाठी जमली होती. पावसाचे वातावरण असतानाही भगिनींचा उत्साह मात्र कमी झाला नाही. महिलांसाठी विविध उपक्रम राबवणारे, त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी सदैव धावून जाणारे भूपेंद्र मोरे यांच्या कार्याची उपस्थित भगिनींनी मनापासून प्रशंसा केली.



मोरे यांनी वाहणारे ड्रेनेज असो, परिसरातील कोणताही प्रश्न असो – प्रत्येक विषयावर ठामपणे आवाज उठवला आहे. महिलांच्या सुरक्षिततेपासून ते सुविधा उपलब्ध करून देण्यापर्यंत त्यांनी केलेली कामे हा त्यांचा ठसा उमटवणारा ठरला आहे.

रक्षाबंधनानिमित्त त्यांनी उपस्थित सर्व भगिनींना "माहेरची साडी" आहेर म्हणून दिली. यावेळी बोलताना मोरे म्हणाले – "रक्षाबंधन हे निमित्त आहे, पण महिला-भगिनींसाठी मी कायमस्वरूपी तत्पर राहिलो आहे आणि राहीन. त्यांच्या कोणत्याही अडचणी सोडवण्यासाठी, नवे उपक्रम राबवण्यासाठी मी सदैव सज्ज आहे."

या सोहळ्यास सोनाली नायर, प्रियांका सिंग, सविता डोके, कौशल्या खोडके, संगीता खोडके, सुवर्णा बिडकर, नम्रता लाड आदींसह असंख्य महिला उपस्थित होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवराज्य समूहाचे हरीश वैद्य, लतीफ शेख, प्रशिक दारुंडे, सुनील पढेर यांनी परिश्रम घेतले.

राखीचा धागा आणि विश्वासाचा बंध – या दोन्हींचा सुगंध नऱ्हेभर दरवळत होता.

## श्री चिंतामणीच्या दर्शनाला भाविकांनी केली गर्दी

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

श्रावण महिन्यातील अंगारक चतुर्थी असल्याने भाविकांनी श्री चिंतामणीच्या दर्शनाला पहाटे पासून गर्दी केली होती. पहाटे पुजारी आगलावे बंधु यांच्या हस्ते श्रींची पूजा करण्यात आली. चिंचवड देवस्थानच्या वतीने श्री चिंतामणीची महापूजा करण्यात आली . यावेळी विश्वस्त केशव उमेश विद्वांस उपस्थित होते. देवस्थान तर्फे मंदिर प्रांगण आणि मंदिराबाहेर मांडव घालण्यात आला होता . दर्शनबारी व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. चिंचवड देवस्थान ट्रस्ट आणि तर्पण ब्लड सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या प्रमाणात शिबिरात सहभाग घेऊन रक्तदान करण्याचे श्रेष्ठ कार्य केले. दुपारी देवस्थान तर्फे भाविकांना उपवासाची खिचडी



वाटण्यात आली. सायंकाळी चिंतामणी भजनी मंडळ यांचे साथीने ह.भ. प.उगले (महाराज) आळंदी यांचे सुभाष्य कीर्तन झाले, चंद्रोदयानंतर श्रींचा छबिना निघला त्यांनतर उपस्थित भाविकांना ग्रामस्थांतर्फे महाप्रसाद देण्यात आला. जास्त गर्दी होण्याची शक्यता असल्याने देवस्थान तर्फे जादा सुरक्षा व्यवस्था करण्यात केली होती. थेऊर ग्रामपंचायती तर्फे पार्किंगची व्यवस्था करण्यात आली होती.

## सचिन मणेरे यांचा वाढदिवस उत्साहात; 'हर घर तिरंगा' मोहिमेस प्रारंभ

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

खडकवासला भाजप उत्तर मंडल सरचिटणीस सचिन मणेरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने 'हर घर तिरंगा' मोहिमेचा शुभारंभ खडकवासला विधानसभा मतदारसंघात करण्यात आला. नुकतीच मणेरे यांची या अभियानासाठी खडकवासला मतदारसंघ संयोजक म्हणून निवड झाली आहे.



कार्यक्रमाला खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. भीमराव अण्णा तापकीर प्रमुख उपस्थित होते. तसेच खडकवासला विधानसभा मतदारसंघ अध्यक्ष मा. श्री सचिनभाऊ मोरे, माजी नगरसेवक मा. श्री राजाभाऊ लायगुडे, मा. श्री हरिदासजी चरवड, मा. श्री बाळासाहेब नवले, वडगाव-धायरी मंडल अध्यक्ष मा. श्री यशवंत लायगुडे, राष्ट्रीय अध्यक्ष उमाजी नाईक क्रांती संघटना मा. श्री दौलत नाना शितोळे, सामाजिक कार्यकर्ते दीपक शेठ चव्हाण, सामाजिक कार्यकर्ते दशरथ शेठ मणेरे, बाळासाहेब मणेरे, प्रभाग अध्यक्ष पै.तुषार पोकळे ॲड. श्री अरविंद मणेरे, सामाजिक कार्यकर्ते शरद दबडे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार तापकीर यांनी सचिन मणेरे यांच्या कार्याचे कौतुक करत, "आगामी काळातही त्यांनी समाज आणि पक्षकार्यासाठी सक्रिय राहावे" अशी भावना व्यक्त केली.

वाढदिवसानिमित्त सचिन मणेरे म्हणाले, "आगामी काळात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून जनसेवेसाठी तत्पर राहणार आहे. 'हर घर तिरंगा' अभियानात खडकवासला मतदारसंघ उत्तम कामगिरी करेल, असा मला विश्वास आहे."

कार्यक्रमाला कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशभक्तीचा उत्साह आणि एकात्मतेचा संदेश देत या मोहिमेला प्रारंभ झाला.







## कोल्हेवाडीत रक्षाबंधनानिमित्त हजारो महिलांचा उत्स्फूर्त सहभाग

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दत्ताभाऊ कोल्हे यांना राखी बांधून बहिणींचे प्रेम व्यक्त

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

कोल्हेवाडी येथे रक्षाबंधनाचे औचित्य साधून भव्य रक्षाबंधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन भाजप ओबीसी मोर्चा प्रदेश सचिव दत्ताभाऊ कोल्हे यांनी केले होते. या उपक्रमात खडकवासला व कोल्हेवाडी परिसरातील हजारो महिला मोठ्या उत्साहाने सहभागी झाल्या.

महिलांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रतिमेस राखी बांधून आपले प्रेम व्यक्त केले, तसेच दत्ताभाऊ कोल्हे यांना राखी बांधून आत्मीयता आणि विश्वासाचा संदेश दिला. महिलांसाठी विविध शासकीय योजना, शिबिरे आणि



उपक्रमांद्वारे स्वावलंबन घडवण्यास आपण नेहमीच प्राधान्य दिले असल्याचे दत्ताभाऊंनी सांगितले. त्यांनी सर्व लाडक्या बहिणींचे आभार मानत, आगामी काळातही जनसेवेसाठी तत्पर राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

खडकवासला भाजप अध्यक्ष सचिन मोरे यांनी दत्ताभाऊ कोल्हे यांच्या या उपक्रमाचे स्वागत केले. यावेळी मंडलाध्यक्ष रुपेश घुले पाटील, शासन नियुक्त समिती सदस्य सचिन दांगट, जिल्हा उपाध्यक्ष अनिल मते, भाजप युवा मोर्चा निखिल धावडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमासाठी अंकित कोल्हे व अजय कोल्हे मित्र परिवार व संत सावता माळी तरुण मंडळ कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

रक्षाबंधन कार्यक्रमाचे हे सलग चौथे वर्ष असून, दत्ताभाऊ कोल्हे व धनश्री ताई कोल्हे ह्या दाम्पत्याने राबवलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र स्वागत झाले.

उपस्थित महिलांना 'माहेरची साडी' म्हणून भेट देण्यात आली तसेच अल्पोपहाराचीही सोय करण्यात आली. एकंदरीत, महिलांच्या हजारोंच्या सहभागामुळे कोल्हेवाडीत रक्षाबंधनाचा उत्साह द्विगुणित झाला.

## श्रावण गुरुवारी कानिफनाथ गडावर महाप्रसाद सोहळा



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

कानिफनाथ गड हे भाविकांचे श्रद्धास्थान असून, श्रावणातील गुरुवार हा दिवस येथे विशेष महत्त्वाचा मानला जातो. यावेळी हजारो भक्त दर्शन आणि महाप्रसादासाठी उपस्थित राहतात. मंदिर परिसर भक्तिभावाने निनादतो, फुलांनी सजतो आणि ढोल-ताशांच्या गजरात भाविकांची पंक्ती लागते.

ह्या श्रावण महिन्यातील तिसऱ्या गुरुवारी, दिनांक १४ ऑगस्ट २०२५ रोजी, श्री क्षेत्र कानिफनाथ गड (मु. पो. बोपगाव, ता. पुरंदर, जि. पुणे) येथे भव्य महाप्रसाद सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ११.०० ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत हा महाप्रसाद होणार आहे. हा

● **ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्यातर्फे आयोजन**

महाप्रसाद सामाजिक-धार्मिक कार्यात अग्रणी असणारे माजी उपमहापौर, ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या वतीने होत आहे. त्यांनी गेली अनेक वर्षे कानिफनाथ गडावर महाप्रसादाची परंपरा जपली आहे. महाप्रसाद हा अन्नसोहळा नसून एकात्मतेचा संदेश देणारा प्रसंग आहे. विविध भागांमधून आलेले भक्त एकत्र बसून प्रसादाचा लाभ घेतात. "भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा व श्री कानिफनाथ महाराजांच्या कृपाशिर्वादाचा अनुभव घ्यावा," असे आवाहन ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी केले आहे.



# गोबेल्सचा अवतार

गोबेल्स दुसऱ्या महायुद्धाच्या काळात होऊन गेला असला, तरीही त्याचे खोटा प्रचार आणि सातत्याने तेच ते बरळणे जगाच्या इतिहासात कायम राहिले आहे. या गोबेल्सचे नवे अवतार आहेत, आपले ५५ वर्षांचे युवराज राहुल गांधी. त्यांनी भाजपवर मतचोरीचा आरोप करताना सारख्या त्याच त्याच गोष्टी सांगण्याचा सपाटा लावला आहे आणि कालांतराने सातत्याने तेच तेच बोलत राहिल्याने लोकांनाही त्यात तथ्य आहे असे वाटू लागण्याचा संभव आहे. गोबेल्स असाच यशस्वी झाला होता. राहुल यांना ठाऊक आहे, आपला पक्ष लोकांमध्ये निवडून येऊ शकत नाही आणि त्यामुळे भाजपवर सातत्याने आरोप करत राहणे हेच एक त्यांनी मूलमंत्र म्हणून स्वीकारले आहे. राहुल यांनी मतचोरीचा आरोप केल्यानंतर भाजपने त्याची तपासणी केली असता त्यातील काही आरोप निव्वळ चुकीचे आहेत असे दिसून आले आहे. महादेवपुरा या कर्नाटकातील मतदारसंघात घोटाळा झाल्याचा आरोप राहुल यांनी केला. पण महादेवपुरातच नव्हे तर इतर चार मतदारसंघांत काँग्रेसने आघाडी घेतली आहे. राहुल यांच्या सततच्या आरोपांमुळे भाजपही आक्रमक झाला असून मुख्यमंत्री फडणवीस यानी राहुल यांच्या मेंदूतील चिपची चोरी झाली आहे असा आरोप केला आहे. मतांची चोरी करून भाजप सत्तेत आला आहे, हा राहुल गांधी यांचा आरोप आहे. त्याच्या निवडणूक आयोगाने ठिकऱ्या उडवल्या आहेत. महाराष्ट्र विधानसभा ही राहुल यांची प्रयोगशाळा आहे. त्यांनी महाराष्ट्रात मतदारांची संख्या वाढली आणि त्याचा फायदा भाजपला झाला असा आरोप केला होता. पण त्यातील हवाही निवडणूक आयोगाने काढली आहे. शकुन राणी यांच्यावर राहुल यांनी आरोप केला होता, की त्यांनी दोन वेळेस मतदान केले. त्या राणी यांनी आपण एकदाच मतदान केले, असे सागितले आहे. निवडणूक आयोगाने राहुल यांना



या आरोपाबाबतची अधिक माहिती सादर करण्यास सांगितले आहे. त्यातच राहुल यांची हवा गेली आहे. पण, 'गिरे तो भी टांग उपर' या न्यायाने राहुल कबूल करणार नाहीत आणि आयोगावर आणि भाजपवर आरोप करत राहणार हे सत्य आहे. वास्तविक राहुल हे भाजपच्या विजयाने अस्वस्थ झाले आहेत आणि त्यांनी आपल्या पूर्वाश्रमीच्या विरोधी पक्षांप्रमाणे जनतेत जाऊन काम करणे अपेक्षित आहे. पण ते न करता भाजप आणि आयोगावर आरोप करत राहणे हा त्याचा रडीचा डाव आहे. राहुल सातत्याने तो खेळ खेळत आले आहेत आणि युवराज असल्याने सर्व जनता आपल्या मागे असल्याचा भ्रम त्यांना आहे. पण तसे असते, तर निवडून पुरेसे संख्येने का आले नाहीत? या प्रश्नाचे उत्तर राहुल यांच्याकडे नाही. राहुल यांना एकच माहीत आहे, की गोबेल्सप्रमाणे एकच गोष्ट वारंवार सांगितल्याने ती आज ना उद्या जनतेला पटल्याशिवाय राहणार नाही. पण तसे होत नाही आणि गोबेल्सच्या बाबतीतही ते झाले नव्हते. राजकारणात खोटेपणा काही मर्यादेपर्यंत केला जातो. पण, कायमस्वरूपी तो चालत नाही आणि करताही येत नाही. राहुल यांच्या नेतृत्वाखाली विरोधी पक्ष सातत्याने नौटंकी करत आहेत. कधी लोकसभेत व्होट चोरीचा आरोप करतात, तर कधी बिहारच्या मतदार याद्यांच्या पडताळणीत बोगस मतदारांची नावे शोधून त्यांना वगळण्यात येत असल्याने काँग्रेस आणि राजद हे अस्वस्थ झाले आहेत. मग हा प्रयोगच कसा फसवा आहे ते सांगणे. कारण हेच दोन पक्ष आहेत, की ज्यांना या मतदारांच्या नावाने गोंधळ घालता येत होता. आपल्या आरोपांची जनता गंभीर दखल घेत नाही हे पाहून विरोधकांनी संसदेवर मोर्चा काढला. हे देशविरोधी पाऊल आहे आणि याचा अर्थ एक आहे, की विरोधकांनी आता सरळसरळ अराजकतावादी भूमिका स्वीकारली आहे. स्वतःच्या अपयशामुळे जागा गमावल्या आणि खापर मात्र आयोगावर आणि भाजपवर हे विरोधकांचे नेहमीचे तंत्र आहे आणि ते जनता स्वीकारण्याच्या मनस्थितीत नाही. पंतप्रधान मोदी यांना सत्तेवरून दूर करणे हा विरोधकांचा एकमेव अजेंडा आहे आणि या ना त्या प्रकारे ते शक्य नाही असं दिसताच त्यांनी हे रडीचे डाव खेळण्यास सुरुवात केली आहे. आपले आरोप सिद्ध करता येणे शक्य नाही हे कळून चुकल्यामुळे राहुल असोत किंवा राजद असो, त्यांच्यापुढे सध्या एकच मार्ग आहे, तो म्हणजे देशात अशांतता फैलावण्याचा पवित्रा स्वीकारणे. तोच मार्ग सध्या विरोधी पक्षांनी वापरला आहे. काँग्रेसने भाजपवर मतचोरीचा आरोप केला असतानाच सिद्धरामय्या यांच्या सरकारातील एक मंत्री राजण्णा यांनी मतचोरीचा आरोप अस्वीकारार्ह असल्याचा मुद्दा काढला तेव्हा राहुल यांनी त्यांना राजीनामा देण्यास सांगितले. राजण्णा यांनी राजीनामा दिला आहे. म्हणजे राहुल यांच्या या आरोपाची नौटंकी त्यांच्या पक्षातही सर्वांना मान्य नाही. त्यामुळे राहुल किती खोटे बोलतात हे सिद्ध झाले आहे. राहुल असो, की इंदिरा गांधी असोत, की काँग्रेसचा कुणीही नेता, त्याने राष्ट्रहिताला कायम दुय्यम लेखले आहे आणि त्याचीच शिक्षा ते आज भोगत आहेत. पण, अजूनही राहुल यांच्यासारखा बालबुद्धीचा नेता ज्याला काँग्रेसजन 'युवराज' म्हणतात. त्याला बुद्धी सुचत नाही. हेच खरे. वास्तविक राहुल यांचे मतचोरीचे आरोप आणि आरोप सिद्ध करण्याचे आव्हान दिले, की पळून जाणे याला जनताही कंटाळली आहे. महाराष्ट्रातही ईव्हीएम हॅक होतात, असा आरोप झाला होता आणि आयोगाने जेव्हा महाराष्ट्रातील सर्व पक्षांना हा आरोप सिद्ध करण्यासाठी बोलावले, तेव्हा अजित पवार यांच्यासह सारे लोक गैरहजर राहिले. फक्त आरोप करणे सोपे असते पण तो सिद्ध करणे अवघड असते हे त्याना माहीत आहे. राहुल यांनी तर कित्येकदा माफी मागितली आहे आणि खरे तर माफीवीर तेच आहेत! पण त्यांनी माफी मागितली, की काहीच बोलायचे नाही असे मौन पाळून बसण्याची सवय काँग्रेस आणि विरोधी पक्षांनी स्वत:ला लावून घेतली आहे. राहुल यांची ताजी नौटंकी ही त्यांच्या याच मालिकेतील एक भाग आहे आणि यामुळेच ते सत्तेत येणार नाहीत. राहुल जितक्या लवकर हे ओळखतील तितके त्यांच्यासाठी चांगले.

# वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी अडथळे काढण्यासाठी पाहणी

## भूपेंद्र मोरे यांनी केली होती मागणी

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीमुळे नागरिकांना होणारा त्रास दूर करण्यासाठी मुख्य रस्त्यावर अडथळा ठरत असलेले महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ (MSEB) व पुणे महानगरपालिकेचे विद्युत खांब तसेच डीपी हलविण्यासाठी अधिकारी यांनी सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्यासमवेत पाहणी केली.

नऱ्हेतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी या कामासाठी सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्यांच्या प्रयत्नांमुळे आज प्रत्यक्ष पाहणी दौऱ्याचे आयोजन करण्यात आले. यापूर्वीच PMC ने सदर काम करण्याबाबतची तयारी MSEB ला लेखी पत्राद्वारे कळवली होती. तसेच दरपत्रक सादर करण्याची सूचना




**नऱ्हेतील वाहतूक कोंडी बाबत अधिकाऱ्यांना अडथळे काढण्यासंबंधी अनेक वेळा मागणी केली होती. आज अखेर अधिकाऱ्यासमवेत पाहणी केली. हे काम तातडीने सुरू करून नऱ्हे परिसरातील वाहतूक कोंडीला लवकरच दिलासा मिळेल असा विश्वास वाटतो**

**- श्री भूपेंद्र मुरलीधर मोरे, सामाजिक कार्यकर्ते**

केल्याने पाहणीला गती मिळाली.

लवकरच हे अडथळे काढून वाहतूक कोंडी कमी होण्याची शक्यता आहे. पाहणीवेळी सामाजिक कार्यकर्ते श्री. भूपेंद्र मोरे, MSEB चे सहायक अभियंता श्री. शशिकांत शितोळे, PMC पथ विभाग सौ. कोलते, PMC विद्युत विभाग श्री. आशिष राऊत , डॉ. सुधाकरराव जाधवर, पत्रकार मिलिंद पानसरे, हरीश वैद्य, लतीफ शेख तसेच संबंधित अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# थोडक्यात



## आर. के. फॅशनचे भव्य उद्घाटन

**पिंपरी चिंचवड (आरंभ पर्व) : स्टायलिश व आधुनिक वस्त्रसंग्रहाचे नवे ठिकाण असलेले आर. के. फॅशन या कपड्यांच्या दुकानाचे भव्य उद्घाटन पिके इंग्लिश मीडियम स्कूलचे संस्थापक अध्यक्ष जगनाथ काटे यांच्या हस्ते संपन्न झाले. या प्रसंगी दुकानाचे मालक ऋतिक लालासाहेब कांबळे, त्यांचा संपूर्ण परिवार व नातेवाईक मोठ्या उत्साहात उपस्थित होते. रहाटणी चौक, पिंपळे सौदागर, पुणे येथे असलेल्या या दुकानात नव्या फॅशन ट्रेंड्स, दर्जेदार कापड व आकर्षक डिझाईन्स यांचा संगम असून सर्व वयोगटांसाठी वस्त्रसंग्रह उपलब्ध आहे. उद्घाटनावेळी पाहुण्यांनी आर. के. फॅशनच्या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या व व्यवसायाच्या उज्ज्वल भविष्यासाठी आशीर्वाद व्यक्त केले.**




## अनुलोम संस्थेचा रक्षाबंधन सोहळा संपन्न

**नांदेड (आरंभ पर्व) : बंधुभाव, आपुलकी आणि कृतज्ञतेचे प्रतीक असलेला रक्षाबंधन सण अनुलोम संस्थेच्या वतीने आज नांदेड सिटी पोलीस स्टेशन येथे साजरा करण्यात आला. या विशेष उपक्रमाचे नियोजन भाग जनसेविका सौ.नयन चव्हाण व सक्रिय अनुलोम-मैत्रिणी सौ. राजश्रीताई घोरपडे आणि श्री अनिकेत घोरपडे यांनी केले होते. कार्यक्रमाला वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस , संपूर्ण पोलीस स्टाफ तसेच भाजप प्रदेश सचिव धनराज गवळी यांची विशेष उपस्थिती होती. अनुलोम संस्थेच्या कार्यकर्त्या व महिलांनी पोलीस बांधवांना राखी बांधून त्यांच्या समाजरक्षणातील सेवेसाठी आभार व्यक्त केले. रक्षाबंधनाच्या निमित्ताने पोलिसांसोबत स्नेहसंवाद साधत त्यांच्याशी आत्मीयतेने संवाद करण्यात आला. वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस यांनी अनुलोम संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक करत, समाजातील सुरक्षा आणि लोकांमधील विश्वास दृढ करणारे असे कार्यक्रम अधिक प्रमाणात व्हावेत, असे मत व्यक्त केले. धनराज गवळी यांनी पोलीस दलाच्या समर्पित सेवेला मानाचा मुजरा देत रक्षाबंधनासारख्या सणांमुळे समाजातील ऐक्य व सौहार्द वाढते, असे सांगितले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी अनुलोमच्या कार्यकर्त्या व मैत्रिणींनी परिश्रम घेतले. उपस्थितांनी रक्षाबंधनाच्या शुभेच्छा देत कार्यक्रमाला उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले.**

# सोमवारी महादेव मंदिरात भक्तिभावाने अभिषेक

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

श्रावणातील दुसऱ्या पवित्र सोमवारी, खडकवासला मतदारसंघातील प्राचीन व पवित्र श्री जर्शेश्वर महादेव मंदिरात आमदार भीमराव तापकीर यांनी भक्तिभावाने अभिषेक करून दर्शनाचा लाभ घेतला. या प्रसंगी त्यांनी महादेवाच्या चरणी सर्वांच्या सुख, समृद्धी व उत्तम आरोग्यासाठी प्रार्थना केली. धुप, दीप, फुले व मंत्रोच्चारांच्या गजरात झालेल्या या अभिषेक सोहळ्यात भाविकांची मोठी उपस्थिती होती. श्रद्धा, भक्ती आणि सेवेचा संगम घडवणाऱ्या या दिवसाचे औचित्य साधून परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.



या खडकवासला ग्रामीण अध्यक्ष नवनाथ तागुंदे ,मांडवी सरपंच सचिन पायगुडे, दत्ता पायगुडे, गजानन पायगुडे, श्रेयश पासलकर, राज रजपूत यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी आमदार भीमराव तापकीर यांनी भक्तांशी संवाद साधला. या परिसरातील विविध विकासकामासाठी सहकार्य करू असे त्यांनी यावेळी सांगितले.

# धायरीत मनसेतर्फे दहीहंडीला आगळावेगळा साज

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी परिसरातील दहीहंडी उत्सवाला यंदा महाराष्ट्र नवनिर्माण सेना खडकवासला विभागाने भक्तिमय आणि सामाजिक स्वरूप देण्याचा संकल्प केला आहे. शनिवार, दि. १६ ऑगस्ट २०२५ रोजी सायं. ६ ते रात्री १० या वेळेत पोकळे वडापाव समोर, गणेश नगर, धायरी येथे भव्य अन्नकोट सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षी धायरी फाटा ते धायरी गाव परिसरात दहीहंडी पाहण्यासाठी लाखोंच्या संख्येने भाविक जमतात. याच पार्श्वभूमीवर, यंदा दहा हजारांहून अधिक गोविंदा, गोपाळ आणि श्रद्धाळूंना अन्नकोट (भंडारा) व महाप्रसादाचे वितरण करण्यात येणार आहे. यासाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करण्यात आले असून सर्व भाविकांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# पीएमपीएलच्या रक्षाबंधन 'लकी ड्रॉ'ला महिला प्रवाशांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (पीएमपीएल) तर्फे रक्षाबंधनाच्या निमित्ताने महिला प्रवाशांसाठी विशेष लकी ड्रॉ योजना राबविण्यात आली असून, या योजनेला महिला प्रवाशांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या योजनेत विजेत्या महिलेला खास पैठणी व एक महिन्याचा मोफत बस पास बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. ही योजना पीएमपीएलचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक माननीय पंकज देवरे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आली. धायरी मारुती मंदिर बस स्थानक येथे आगार व्यवस्थापक शैलेंद्र नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली व वाहतूक नियंत्रण अधिकारी शिवाजीराव हत्ती काळे यांच्या उपस्थितीत वाहक तानाजी कांबळे यांनी महिला प्रवाशांना लकी ड्रॉविषयी माहिती दिली.



यावेळी कूपनचे वाटप करून जास्तीत जास्त महिलांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले. कांबळे यांनी सांगितले की, पीएमपीएलचा प्रवास महिलांसह सर्व प्रवाशांसाठी सुरक्षित असून, नागरिकांनी अधिकाधिक प्रमाणात बसने प्रवास करावा. या योजनेला महिला प्रवाशांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला असून, उपस्थित महिला प्रवासी नमिता पिंगळे व सुमन मारणे यांनी पीएमपीएलच्या या अनोख्या उपक्रमाबद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमाला चालक खंडू जाधव, महिला प्रवासी व इतर प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिंहगड कॉलेज ऑफ सायन्समध्ये ३२ वा वर्धापन दिन साजरा

## रक्तदान, वृक्षारोपण व मार्गदर्शनपर सत्रांचा उत्साह




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सिंहगड टेक्निकल एज्युकेशन सोसायटी, पुणे यांच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त सिंहगड कॉलेज ऑफ सायन्स, आंबेगाव येथे विविध उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांना संस्थापक अध्यक्ष प्रा. एम. एन. नवले, सचिव डॉ. सुनंदा नवले, उपाध्यक्ष डॉ. रोहित नवले आणि उपाध्यक्षा डॉ. रचना नवले-अष्टेकर यांची प्रेरणा लाभली.

या दिनानिमित्त रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. उद्घाटन डॉ. राजीव खटावकर (रक्तसंक्रमण अधिकारी) व प्राचार्य डॉ. मगन घाटुळे यांच्या हस्ते झाले. मार्गदर्शन करताना त्यांनी रक्तदानाचे सामाजिक महत्त्व अधोरेखित केले व विद्यार्थ्यांना नियमित रक्तदान करण्याचे आवाहन केले. शिबिरात सुमारे ६० जणांनी उत्साहपूर्वक रक्तदान केले. रक्तसंकलनासाठी श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेज अँड जनरल हॉस्पिटल, नऱ्हे रक्तपेढीने सहकार्य केले.

तसेच वृक्षारोपणाचा उपक्रमही पार पडला. प्राचार्य डॉ. घाटुळे यांनी वृक्षारोपण करताना पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कार्यक्रमासाठी विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, एनएसएस स्वयंसेवक तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वर्धापन दिनानिमित्त संस्थेच्या मूल्यांवर, राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०, कौशल्याधारित शिक्षण आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या विषयांवर तज्ज्ञ मान्यवरांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशासाठी बीसीए विभागप्रमुख, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी आणि मीडिया समन्वयक यांनी विशेष परिश्रम घेतले.

# केके केअर हॉस्पिटलचा आर्थोरिन्यू सोबत सहयोग : रिजनरेटिव्ह मेडिसिनचे पुण्यात नवीन पर्व

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणेस्थित केके केअर हॉस्पिटलने जगातील सर्वांत अद्ययावत नॉन-सर्जिकल (शस्त्रक्रियेविना) आर्थोपेडिक्स उपचार प्रदान करण्यासाठी आर्थोरिन्यू सोबत सहयोग केला आहे. आर्थोरिन्यू हे अमेरिकास्थित रिजेनेक्स युएसए चे भारतातील अधिकृत प्रतिनिधी आहेत. रिजेनेक्स युएसएची स्थापना 20 वर्षांपूर्वी झाली असून त्यांनी जगभरात 5,20,000 हून अधिक रुग्णांवर यशस्वीरित्या उपचार केले आहेत. तसेच हे अनेक प्रकारच्या शस्त्रक्रियांसाठी एक विश्वासार्ह पर्याय ठरले आहे. मुंबईस्थित आर्थोरिन्यू ने केके केअर हॉस्पिटलसोबत केलेल्या सहयोगामुळे लोकांना स्वत:च्या




शरीराच्या पेशी वापरून शक्य असेल तिथे शस्त्रक्रिया टाळत विविध सामान्य आर्थोपेडिक समस्यांवर उपचार घेता येणार आहेत,ही माहिती पत्रकार परिषदेत भूलतज्ज्ञ व वेदना व्यवस्थापन तज्ज्ञ आणि केके केअर हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.वर्षा कुऱ्हाडे, वेदना व्यवस्थापन तज्ज्ञ डॉ.माधुरी लोकापूर,लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ.श्रीकांत कुऱ्हाडे आणि आर्थोपेडिक सर्जन डॉ.तुषार चौधरी यांनी दिली. याप्रसंगी फिजिशियन डॉ.महावीर सतीशचंद बगरेचा व आर्थोरिन्यूचे दिगांत देसाई उपस्थित होते. भूलतज्ज्ञ व वेदना व्यवस्थापन तज्ज्ञ आणि केके केअर हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.वर्षा कुऱ्हाडे म्हणाल्या की, हा सहयोग अस्थि स्नायूंच्या (मस्क्युलोस्केलेटल) स्थितींच्या समस्यांवरील उपचारांसाठी अद्ययावत इंटरव्हेंशनल आणि विना शस्त्रक्रिया पर्याय प्रदान करेल. रिजनरेटिव्ह मेडिसिनमध्ये विविध उपचार योजनांचा समावेश आहे,त्यांचे पेटंट रिजेनेक्स युएसए कडे असून यामध्ये सुपर कॉन्स्ट्रेटेड प्लेटलेटस आणि मेसेनकायमल पेशी (हाडे व कुर्चाशी जोडलेल्या पेशी) वापरल्या जातात.

त्या पुढे म्हणाल्या की, विविध प्रकारच्या खेळांमुळे होणाऱ्या दुखापती, सॉफ्ट टिश्यूज, अस्थिबंध, तंतूमय उती, स्नायू लचकणे आणि स्नायू मुरगळणे (मेनिस्कस), हाडांमधील प्राथमिक टप्प्यातील झीज यासारख्या स्थितींवर या प्रक्रियांद्वारे उपचार केले जाऊ शकतात. यामध्ये प्लेटलेट प्लाझ्माचे प्रमुख स्त्रोत असलेल्या मेसेनकायमल पेशींमधून रक्ताचा नमूना काढला जातो व त्यानंतर रक्ताच्या नमुना वर लॅबमध्ये प्रक्रिया करून आणि लोकल अॅनेस्थेशिया देऊन ते परत शरीरात टाकले जातात, जेणे करून शरीरातील स्वउपचार यंत्रणा उत्तेजित होते. प्लेटलेटसचे केंद्रीकरण हे नियमित पीआरपीपेक्षा 30 पट जास्त असते. या तंत्रज्ञानाला युएस एफडीएची मान्यता आहे. भारतात 18 ते 89 वयोगटातील रूग्णांवर रिजनरेटिव्ह प्रक्रिया करण्यात आली असून अस्थिस्नायूंच्या विविध समस्या (मस्क्युलोस्केलेटल) असलेल्या रूग्णांसाठी ही प्रक्रिया अत्यंत उपयुक्त ठरणारी आहे. आजकालच्या निदान पध्दतींमध्ये एक्स-रे, एमआरआय व्यतिरिक्त सोनोग्राफी करण्याचा कल वाढत चालला आहे. जेव्हा एखादा रूग्ण ओपीडी मध्ये येतो, तेव्हा सोनोग्राफीच्या मदतीने नेमके कोणत्या भागात वेदना होत आहे, ते स्थान शोधता येते,उदा.जर एखाद्याच्या खांद्याला वेदना होत असतील तर आपण त्या व्यक्तीला त्याचे खांदे हलवण्यास सांगू आणि स्नायूंमध्ये वेदना सुरू होण्याची नेमकी जागा शोधू म्हणजेच अशा प्रकारे आपण अचूकपणे जागा शोधू शकतो.

हे करत असताना कोणत्याही प्रकारच्या उपचारानंतर शरीराची हालचाल इष्टतम राखण्यासाठी फिजिओथेरपीची महत्त्वाची भूमिका ही कायम आहे.

इंटरव्हेंशनल ऑर्थोपेडिक्स आणि वेदना व्यवस्थापन (पेन मॅनेजमेंट) - भविष्यातील सुपर स्पेशालिटी

चार दशकांपूर्वी पेन मॅनेजमेंट सोसायटी ही अस्तित्वात आली. डॉ.वर्षा यांच्या मते, अजूनही भारतात वेदना व्यवस्थापन याबाबत जागरूकता नाही. वृध्द व्यक्तींची वाढती लोकसंख्या,खेळाडूंची वाढती संख्या आणि त्यांना होणाऱ्या दुखापती,असामान्य वेदनांना कारणीभूत असलेल्या दीर्घकालीन आजारांमध्ये वाढ या सर्व बाबी लक्षात घेता वेदना व्यवस्थापन हे नजिकच्या भविष्यात भारतातील एक प्रमुख सुपर स्पेशालिटी म्हणून उदयास येईल. आज प्रत्येक घरामध्ये एखाद्या व्यक्तीला तरी कुठल्या ना कुठल्या तरी वेदना होत असतात, मात्र पेन फिजिशियन्सचे प्रमाण हे खूप कमी आहे. केके केअर हॉस्पिटल हे मल्टीस्पेशालिटी सुविधा असून याचे चऱ्होली आणि आळंदी येथे दोन युनिट आहेत.

## थोडक्यात



### किंडरगार्डन इंग्लिश स्कूलमध्ये राखी वाटप कार्यक्रम उत्साहात

खडकवासला (आरंभ पर्व) : रक्षाबंधनाचे अवचित साधून पुणे जिल्हा भाजप उपाध्यक्ष अनिल मते यांनी किंडरगार्डन इंग्लिश स्कूल यशवंत विद्यालय खडकवासलामध्ये विद्यार्थ्यांना व खडकवासला गावातील महिलाना राखी वाटप करण्यात आले . या उपक्रमासाठी पुणे शहर भाजप ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रमेश बापू गायकवाड यांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाला खडकवासला विधानसभा सरचिटणीस अजय मते, अनुजा सुशांत पाटील ग्लोबल फाउंडेशनचे प्रोजेक्ट डायरेक्टर श्रीराम चव्हाण, किंडरगार्डन इंग्लिश स्कूलच्या प्रिन्सिपल सोनाली खंदरकर, मुख्याध्यापक नंदकुमार फडतरे, गुरुकुल प्रमुख सौ. वैशाली येवले, श्री. हरोले जे. डी., सौ. शितल चवरे, श्री. अमोल जानराव, अश्विनी पालवे आणि दिनेश पालवे आदी मान्यवर उपस्थित होते. राखी वाटपाच्या या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचे आयोजन आणि समन्वय शाळा प्रशासनाने केला.

### राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांची सदिच्छा भेट



बार्शी (आरंभ पर्व) : जवळगाव (ता. बार्शी) येथील "विश्वकुंज निवास" येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते व सोलापूर जिल्हाध्यक्ष आदरणीय उमेश (दादा) पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस विद्यार्थी सरचिटणीस प्रमोद कापसे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला तसेच विविध विषयांवर सविस्तर चर्चा झाली. यावेळी उमेश पाटील यांनी शेतकरी व विविध समाजघटकांच्या हितासाठी महायुती सरकारमार्फत प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. तसेच नुकतेच सोलापूर जिल्हा सरचिटणीस पदी निवड झालेले प्रमोद कापसे यांचेही त्यांनी कौतुक केले. याप्रसंगी सोलापूर जिल्हा सरचिटणीस प्रमोद कापसे, ज्येष्ठ नेते सुरेश भाऊ कापसे, दक्षिण सोलापूर तालुकाध्यक्ष श्री. सुभाष (बापू) पाटील, बार्शी तालुक्यातील कृषिपदवीधर - रोहित जाधव,सुहास अडसूळ, धनाजी गिते, अमोल गोसावी,तुषार चोरमले, सुदर्शन सावंत, कृष्णात शेळके, जवळगाव येथील रमेश ढेंगळे बाबासाहेब कापसे नानासाहेब ढेंगळे ,चंद्रकांत डीसले,अंबऋषी कापसे, बालाजी वीर, प्रकाश डिसले,किरण धेंडे,गौतम धेंडे, प्रशांत कापसे, दीपक कापसे संजय नागटिळक ,गणेश कापसे, विपिन पाटील, सोमनाथ पाटील, अंकुश गाटे ,ज्ञानेश्वर निचळ, गणेश चौधरी , रशीद शेख तसेच पंचक्रोशीतील कृषी पदवीधर व नागरिक उपस्थित होते.

### निलेश गिरमे यांच्या रक्षाबंधन कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



धायरी (आरंभ पर्व) : शिवसेना युवासेना आणि संकल्प प्रतिष्ठान तर्फे मुख्यमंत्र्यांच्या लाडक्या बहिणींसाठी सामूहिक रक्षाबंधनाचा भव्य सोहळा अभिरुची मॉल शेजारील शिवसेना जनसंपर्क कार्यालयात उत्साहात पार पडला. या विशेष कार्यक्रमासाठी धायरी परिसरासह आसपासच्या भागातील हजारो महिला भगिनींनी "एकच वादा – निलेश दादा" असा जयघोष करत उपस्थिती लावली. लहान मुलींपासून ते जेष्ठ मातृशक्तीपर्यंत सर्वांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला. पावसाच्या जोरदार सरी अंगावर घेत, आपल्या लाडक्या भावाला राखी बांधण्याचा महिलांनी निश्चय केला आणि तो पूर्णत्वास नेला. राखी बांधताना अनेक भगिनींनी निलेश गिरमे यांना मनापासून आशीर्वाद दिले. त्यावर गिरमे म्हणाले, "हा तुमचा मोठा भाऊ, कोणत्याही परिस्थितीत कायम तुमच्या पाठीशी खंबीर उभा राहील," असा शब्द देत बहिणींचा विशेष सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिवसेना युवासेना पदाधिकारी, कार्यकर्ते व संकल्प प्रतिष्ठानचे सदस्य उपस्थित होते. रक्षाबंधनाचा हा सोहळा, प्रेम, आपुलकी आणि बांधिलकी यांचा एक सुंदर संगम ठरला.

# मुंबई ते मुंबई एक आनंदमय प्रवासवर्णन

**पुस्तक परीक्षण - श्री. नंदकुमार गांधी, पुणे**



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मुंबई ते मुंबई हे पुस्तक म्हणजे अजित वर्तक नावाच्या एका 'आनंदयात्री'चे आपल्या देश - विदेशातील 'फिरस्तेगिरी 'चे मनोवेधक वर्णन आहे. वडिलांच्या रेल्वे मधील नोकरीमुळे लहानपणापासून देशातल्या प्रेक्षणीय स्थळे पाहण्यासाठी श्री अजित वर्तक यांची निघालेली ही 'फिरस्ता एक्स्प्रेस' रुळत रुळत त्यांची पन्नाशी उलटली तरी आजतागायत रूळावर धावतच आहे.

लेखकाने १९९४ ते २०२४ अशा तीस वर्षांच्या आपल्या देशांतर्गत व विदेशात (इंग्लंड व युरोपीय देश) केलेल्या फिरस्तेगिरीचे रसाळ, मनोवेधक वर्णन वरील पुस्तकाच्या दोन भागांतून वाचकांच्या समोर ठेवले आहे. लेखक कॉम्प्युटर इंजीनियर असल्याने भारतातील विविध नामांकित आयटी कंपन्यांमधे उच्च पदांवर त्यांनी नोकरी केली. त्यानिमित्ताने देशात व परदेशात वेळ मिळेल तेव्हा मनसोक्त भटकंती झाली. शेजारी - पाजारी, कुटुंबिय, नातेवाईक, शाळा कॉलेज मधील जुने मित्र, नोकरीतील सहकारी यांच्या साथ संगतीने आळंदी पुणे पासून ते बोर्डी, हिवरे (जि. नाशिक ) किहीम, पारगाव, माथेरान, लोणावळा (मन:शक्ती केंद्र), वडोदरा, अहमदाबाद, राजस्थान, मथुरा, हरिद्वार, ग्वाल्हेर ते जम्मू लेह पर्यंत तसेच लंडन, युरोप, मलेशिया, सिंगापूर अशी ही 'फिरस्ता एक्स्प्रेस 'फिरत राहिली. या भटकंतीमधे आलेले कडू - गोड अनुभव, किस्से त्यांनी ओघवत्या शैलीत मांडले आहेत. लेखक श्री. अजित वर्तक यांच्या आई कै. श्रीमती. नीलाताई वर्तक यांनी पुस्तकाच्या भाग दोन मध्ये त्यांनी केलेले (प्रकरण ११ - १२) त्यांच्या परदेशवारीचे सुंदर वर्णन वाचताना असे लक्षात येते की लेखकाला लेखन शैलीचे बाळकडू हे त्यांच्या आईकडूनच मिळालेले आहे. पुस्तक वाचताना आपला मित्रच त्याने केलेल्या प्रवासाचे रसभरीत वर्णन आपल्याला ऐकवित आहे असा भास होतो आणि त्यामुळे पुढे काय असेल अशी उत्सुकता वाढीस लागते. म्हणून मला असे वाटते की लेखकाच्या लेखनाचे हेच बलस्थान आहे. तसेच प्रवासप्रेमींसाठी हे पुस्तक माहितीपूर्ण व उत्तम मार्गदर्शक आहे. लेखकाने आपल्या ह्या आनंदयात्रेमध्ये लिड्सच्या हिंदू मंदिरात पंजाबी, गुजराथी बांधवांनसह पुढाकार घेऊन सार्वजनिक गणेशोत्सवाचा श्रीगणेशा केला. आपल्या मित्रांसह त्यांनी हिवरे येथे पाणी फाउंडेशनच्या उपक्रमात श्रमदान आणि वृक्षारोपणही केले. यातून दिसणारी त्यांची सामाजिक बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद आहे. तसेच लंडन स्थित वासुदेव गोडबोले यांच्या भारतीय इतिहासाशी निगडित स्पेशल टूर मध्ये लेखकाची सामिलकी देशप्रेम दर्शविते.

ह्या पुस्तकात विचारपूर्वक समाविष्ट केलेले सुंदर फोटो, अर्थपूर्ण व विषयाला साजेसे श्री. सतीश भावसार आणि श्री. आशुतोष बर्वे यांनी केलेले मुखपृष्ठ त्याचबरोबर श्री. राजेश बोरसे यांची समर्पक व्यंगचित्रे आणि श्री.जयराज साळगावकर, लेखक आणि कवी श्री.प्रवीण दवणे, डॉ. स्मिता दातार, श्री.अंबरीश मिश्र, आणि श्री. सुनंदन लेले या दिग्गजांच्या लाभलेल्या प्रस्तावना आणि अभिप्राय तसेच लेखकाच्या ओघवत्या लेखनशैली मुळे या पुस्तकाने वेगळीच उंची गाठली आहे.

- **● श्री. नंदकुमार गांधी ●**
- **● मुंबई ते मुंबई भाग १ व २. ●**
- **● पाने - ३०० व २५७ ●**
- **● किंमत - रु.५९९ प्रत्येकी ( भाग १ व २). एकत्रित संच रु.११९८/-●**
- **● लेखक - श्री. अजित वसंत वर्तक**
- **● प्रकाशन - बुकगंगा पब्लिकेशन्स ●**
- **● प्रकाशक - मंदार मोरेश्वर जोगळेकर, सुप्रिया सुनील लिमये. ●**



## रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

धायरी येथे अखंड भारत संकल्प दिनानिमित्त शिववंदना मित्रपरिवार व न्यू आर्या फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज आणि आद्य क्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या प्रतिमांचे पूजन करून करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे दौलत नाना शितोळे, आ. भीमराव तापकीर, शिववंदना मित्रपरिवाराचे प्रमुख प्राज भिलारे, भाजप मंडलाध्यक्ष यशवंत लायगुडे,माजी नगरसेवक बाळासाहेब नवले, युवा उद्योजक दीपक चव्हाण, उद्योजक अशोक भंडारी, शिवचरित्रकार लेखक राहुल नलावडे, वेंकटसाई होंडाचे संतोष कदम, अतुल चाकणकर, पै. तुषार पोकळे, महेश पोकळे, गणेश पोकळे, सारंग नवले,चंद्रशेखर दादा पोकळे,सचिन मनेरे, दत्तात्रय काळे, सचिन नागपूरे, सुरेश महल्ले, शरद शिंदे, केदार कापरे, ब्लड बँकेचे महेश रणदिवे, दशरथ मनेरे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त

## गायकवाडवाडी, बहुली येथे मोफत आरोग्य शिबिर

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

बहुली, गायकवाडवाडी (ता. हवेली) येथे शिवसेना पक्षप्रमुख सन्मा. उद्धवसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त सिल्वर बर्च मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल व शिवसेना खडकवासला मतदारसंघ यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

डॉ. स्वप्निल भोसले व सोनाली दीक्षित यांनी नागरिकांची रक्तदाब, रक्त व शुगर तपासणी केली, तर जोत्स्ना मॅडम, प्रतीक्षा मॅडम व शुभमिता मॅडम यांनी ईसीजी तपासणी केली.



शिबिराचे उद्घाटन शिवसेना जिल्हाप्रमुख प्रकाशभाऊ भेगडे यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी खडकवासला विधानसभा प्रमुख नितीन वाघ, युवा नेतृत्व पै. पप्पुभाऊ गायकवाड, उपसरपंच बंडू भगत, मोहन गायकवाड, पोलीस पाटील नवनाथ भगत, तसेच शिवसेनेचे विविध पदाधिकारी आणि स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिबिराचे आयोजन उपतालुका प्रमुख रामदास गायकवाड व विभागप्रमुख पप्पू अण्णा गायकवाड यांनी केले. नियोजनात सुरज गायकवाड, सौरभ पाटणकर, आदेश मानकर, नवनाथ गायकवाड, दिनेश गायकवाड, मंगेश गायकवाड आणि केतन गायकवाड यांचा सहभाग होता.

## नागेश चव्हाण यांच्यावर मोठी जबाबदारी देण्याचे संकेत

**जवळगाव येथे स्नेहभोजन, ग्रामस्थांच्या उपस्थितीत सत्कार**





**बार्शी (दै. आरंभ पर्व)**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोलापूर जिल्हाध्यक्ष उमेशदादा पाटील यांनी राष्ट्रवादी माथाडी कामगार प्रदेश अध्यक्ष नागेश चव्हाण यांच्या जवळगाव येथील निवासस्थानी स्नेहभोजनास हजेरी लावली. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने पाटील यांचा सत्कार भाजपा सहकार सेवा सहसंयोजक अरुण कापसे यांच्या हस्ते करण्यात आला. उमेश पाटील यांनी यावेळी बोलताना, "नागेश चव्हाण यांच्यावर आगामी काळात मोठी जबाबदारी सोपविणार असून, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांनी कामाला लागावे," असे आवाहन केले. त्यांनी चव्हाण यांना जनतेसाठी कटिबद्ध नेतृत्व असल्याचे सांगून खंबीर पाठिंबाही दिला. यावेळी नागेश चव्हाण यांनी जिल्हाध्यक्ष पाटील यांचे स्वागत करताना, "उपमुख्यमंत्री अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस अधिक मजबूत करू. जनसेवेसाठी पूर्वीप्रमाणेच सज्ज राहू," असे सांगितले.चव्हाण हे शेळगाव व उपळे जिल्हा परिषद गटासह बार्शी पंचायत समितीच्या दृष्टीने पक्षाचे नेतृत्व सांभाळणार असून, बार्शी तालुक्यात मोठ्या राजकीय घडामोडी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. यापूर्वी त्यांनी बार्शी विधानसभा निवडणूक लढवली आहे . सोलापूर जिल्हा रहिवासी संघटना ,राष्ट्रवादी माथाडी कामगार व वाहतूक संघटनांमधील त्यांचे कार्यकर्त्यांचे जाळेही मजबूत आहे.

यावेळी कार्यक्रमाला शिवसेना तालुकाप्रमुख प्रवीण काकडे, सुरेश कापसे, मनसेचे तालुकाध्यक्ष आप्पाभाई गाटे, सुनिल जाडकर, माऊली कापसे, नवनाथ कापसे, पिंटू ढेंगळे, राम ढेंगळे, समाधान कोळी, सभाजी ढेंगळे, विनायक ढेंगळे, आगतराव जाधव, उत्तम चव्हाण, रमेश ढेंगळे, गौतम धेंडे, विशाल बीडबाग, अमोल सुतार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.



## वत्सला मदर अँड चाईल्ड केअर सेंटरचे उदघाटन

**बावधन (दै. आरंभ पर्व)**

आई व बालकांच्या आरोग्याच्या जपणुकीसाठी आणि दर्जेदार वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी वत्सला मदर अँड चाईल्ड केअर सेंटरचे उदघाटन माजी नगरसेवक मा. दिलीप वेडे पाटील यांच्या हस्ते रविवारी संपन्न झाले. या केंद्रामुळे बावधन, कोथरूड आणि आसपासच्या परिसरातील नागरिकांना आधुनिक तंत्रज्ञानासह तज्ज्ञ वैद्यकीय सेवा मिळणार आहेत.उदघाटनप्रसंगी डॉ. कोमल अगरवाल, डॉ. सारिका कारळे आणि डॉ. प्राजक्ता शेळके यांना मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. मातृ-शिशू आरोग्य संवर्धनासाठी त्यांचे योगदान नेहमीच प्रेरणादायी राहील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास स्थानिक नागरिक, वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्त्यांची मोठी उपस्थिती होती. समाजाच्या आरोग्यासाठी सोयी सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे.समाजाच्या सेवेसाठी अशा सुविधा उभारणे ही काळाची गरज असल्याचे माजी नगरसेवक दिलीप वेडे पाटील यांनी सांगितले. यावेळी त्यांनी हॉस्पिटलच्या सर्व स्टाफ व डॉक्टर यांना शुभेच्छा दिल्या.

# बोपोडी येथील पाणी साठवण टाकीचे लोकार्पण

**कार्यकर्त्यापासून मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांच्या प्रयत्नातून राज्य विकासाच्या मार्गावर : आमदार सिद्धार्थ शिरोळे यांचे प्रतिपादन**



**पुणे (दै. आरंभ पर्व) :**

स्थानिक कार्यकर्ते आणि पदाधिकारी यांच्याकडून करण्यात येणारा पाठपुरावा, त्याला मिळणारी लोकप्रतिनिधींची साथ, मंत्री व खुद्द मुख्यमंत्री यांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे राज्य विकासाकडे वाटचाल करत आहे, असे प्रतिपादन शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सिद्धार्थ शिरोळे यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आबेडकर हॉकी स्टेडीयम चिखलवाडी, बोपोडी येथे समान पाणी पुरवठा प्रकल्पा अंतर्गत नव्याने बांधण्यात आलेल्या ३० लाख लिटर क्षमतेच्या पाणी साठवण टाकीचे उद्घाटन आज (दि. १०) आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या च्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, रिपब्लिकन पक्षाचे प्रदेश संघटन सचिव परशुराम वाडेकर, माजी नगरसेका सनी निम्हण , रिपब्लिकन पक्षाचे शहराध्यक्ष संजय सोनवणे , शिवाजीराव मतदारसंघ अध्यक्ष अविनाश कदम , माजी नगरसेवक आनंद छाजेड, दलीत पँथर चे अध्यक्ष यशवंत नडगम , खडकी बोर्डाचे माजी उपाध्यक्ष अभय सावंत, सामजिक कार्यकर्ते बाळासाहेब रांनवडे , बी एल येडे , अॅड सुनील जपे अॅड रीटा उपाध्याय , शहाबुद्दीन काजी, राजेश अग्रवाल, खडकीचे पोलिस निरीक्षक विक्रमसिंह कदम, श्याम काची, योगेश करनूर, अमित मोहिते, अप्पासाहेब वाडेकर, अनिल जोशी, सादिक शेख यांच्यासह परिसरातील विविध सोसायट्यांचे अध्यक्ष, प्रतिनिधी उपस्थित होते.

पुढे बोलताना शिरोळे म्हणाले, विकासाची ही गती यापुढेही कायम ठेवली जाणार असून बोपोडी मधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉकी स्टेडियम साठी राज्य शासन आणि महापालिकेकडून निधी उपलब्ध करून देऊन खेळाडूंसाठी अध्ययवत सुविधा उभारल्या जातील. त्याचप्रमाणे या परिसरातील रुग्णालयांना अत्याधुनिक स्वरूप प्राप्त करून देऊन नागरिकांना चांगल्या वैद्यकीय सुविधा देण्याचा संकल्प असल्याचे शिरोळे यांनी यावेळी सांगितले.

या परिसराच्या विकासात रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचे संघटक सचिव परशुराम वाडेकर, माजी उपमहापौर सुनीताबाई वाडेकर यांचे मोठे योगदान असल्याचा उल्लेखही शिरोळे यांनी आवर्जून केला. विशेषतः जनसेवेसाठी सुनीताताई यांची जिद्द आणि आत्मीयता प्रभावित करणारी ठरली, असेही त्यांनी नमूद केले.

महायुती सरकारच्या कार्यकाळात भारतीय जनता पक्ष आणि मित्र पक्षांच्या साथीने स्थानिक पातळीपासून राज्य पातळीपर्यंत विकास आणि वेग घेतला असून विरोधक दीर्घकाळ विरोधातच राहतील, असा टोलाही त्यांनी लगावला.



## थोडक्यात



### गंगाधर भडावळे यांच्या सौजन्यातून ज्येष्ठ नागरिकांना प्रमाणपत्रांचे वाटप

धायरी (आरंभ पर्व) : धायरी परिसरातील ज्येष्ठ नागरिकांसाठी पुणे महानगरपालिकेचे माजी स्वीकृत नगरसेवक व भाजप नेते गंगाधर भडावळे यांच्या सौजन्यातून विरंगुळा केंद्र येथे प्रमाणपत्र वितरण सोहळा पार पडला. या उपक्रमांतर्गत ज्येष्ठांना आधारकार्ड तसेच विविध शासकीय प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला नागरिकांनी भडावळे यांच्या समाजाभिमुख कार्याचे कौतुक करत, विशेषतः ज्येष्ठांसाठी त्यांनी राबवलेल्या उपक्रमांमुळे परिसरात विश्वास व आपुलकीचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगितले. यावेळी भडावळे म्हणाले, “नागरिकांचा आशीर्वाद हीच माझी खरी ताकद आहे. समाजातील प्रत्येक घटकासाठी मी कायम प्रयत्नशील राहणार असून, हा उपक्रम पुढेही सुरू राहील.” कार्यक्रमास श्री राजेश रासकर, श्री कल्याणराव येवले, श्री मनोहर धुमाळ, श्री श्रीराम पंडित, श्री सुरेश गुरव, श्री सुरेश तेलकर आणि गिट्टे काका यांची उपस्थिती होती. प्रमाणपत्र वाटप हा केवळ औपचारिक कार्यक्रम नसून, ज्येष्ठांना सरकारी योजनांचा थेट लाभ मिळवून देणारा महत्त्वाचा टप्पा असल्याचे भडावळे यांनी सांगितले. उपस्थितांनी या उपक्रमाचे मनापासून कौतुक केले.



### रश्मी घुले पाटील यांच्याकडून कामगार व कर्मचाऱ्यांसोबत रक्षाबंधन साजरे

खडकवासला (आरंभ पर्व) : रक्षाबंधनाच्या शुभदिनाचे औचित्य साधत खडकवासला भाजपा महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ. रश्मी घुले पाटील यांनी सफाई कामगार महिला व पोलीस कर्मचाऱ्यांना राखी बांधून सणाचा आनंद साजरा केला. खडकवासला ‘आरंभ पर्व’ अंतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला. नांदेड सिटी येथील त्यांच्या कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमास मंडल अध्यक्ष रुपेश घुले पाटील, महिला आघाडीच्या उपाध्यक्षा सुप्रिया करमरकर, अशोक तारू, स्वप्नील जाधव, दत्तात्रय जाधव, वामन चक्के, विजय तारू, गणेश कुंभार, राजू जतैरिया, शंकर रणदिवे यांच्यासह विविध सफाई कामगार महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यानंतर नांदेड सिटी पोलीस चौकी येथे भेट देऊन सौ. रश्मी घुले पाटील यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना राखी बांधून सण साजरा केला. “महिला भगिनींसाठी भाऊ हा नेहमीच आधार आणि संरक्षणाचे प्रतीक असतो. रक्षाबंधन हे नात्याचे बंध अधिक दृढ करणारे पर्व आहे,” असे यावेळी त्यांनी सांगितले.

### वृक्षांना व पुस्तकांना राखी बांधून रक्षाबंधन साजरे



राजगुरूनगर (आरंभ पर्व) : राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाच्या परिसरातील वृक्षांना आणि ग्रंथालयातील पुस्तकांना राखी बांधून अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे करण्यात आले. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या महाराष्ट्र महिला उपाध्यक्षा ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांच्या पुढाकाराने महाविद्यालयात झाडे व निसर्गाशी भावबंध जोडत वेगळ्या पद्धतीने राखी पौर्णिमा साजरी करण्यात आली. या प्रसंगी ॲड. राजमाला बुट्टेपाटील यांनी वृक्षांना राखी बांधून वृक्ष संवर्धनाचे व पुस्तकांना राखी बांधून वाचन संस्कृती जोपासण्याचे आवाहन केले. भाऊ- बहिणीच्या नात्याबरोबर निसर्गाची नाते जपूया आणि वाचनसंस्कृतीचे संवर्धन करून जीवन समजून घेऊया असा संदेश त्यांनी यावेळी विद्यार्थ्यांना दिला.

# देखाव्याऐवजी संत, महापुरुषांच्या पादुकांचे दर्शन



**देशातील धार्मिक देवस्थानांचे देखावे उभारण्याची मंडळाची परंपरा आहे. विशेष म्हणजे मंडळ वर्गणी जमा करत नाही. तसेच संपूर्ण देखावा हा फळ्यांवर उभा केला जातो. मध्यभागात गर्दीच्या ठिकाणी हँगिंग मंडप उभारण्याची संकल्पना मंडळाने सर्वप्रथम आणली होती. खड्डे विरहित मंडप, फळ्यांचा मंडप हे मंडळाचे वैशिष्ट्य असून वाहतुकीस अडथळा होणार नाही, अशा प्रकारे रस्त्याच्या वरच्या बाजूला देखावा साकारला जातो. त्याचे स्ट्रक्चरल ऑडिट देखील केले जाते.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सदाशिव पेठेतील श्री गणपती देव ट्रस्ट छत्रपती राजाराम महाराज मित्र मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सवाला १३४ वर्ष झाली आहेत. गणेशोत्सवात दरवर्षी विविध मंदिरांच्या भव्य प्रतिकृती उभारणारे मंडळ म्हणून सर्वत्र सुपरिचित असलेल्या राजाराम मंडळाकडून यंदा देखाव्याऐवजी संत, महापुरुषांच्या पादुकांचे दर्शन गणेशभक्तांना होणार आहे. 'श्रीं' साठी कायमस्वरूपी मंदिराचा संकल्प असल्याने यंदा देखावा उभारण्यात येणार नसल्याचे मंडळाचे अध्यक्ष युवराज निंबाळकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

युवराज निंबाळकर म्हणाले, यंदा देखाव्याऐवजी संत, महापुरुषांच्या पादुकांचे दर्शन आणि मंदिर निर्मितीचा संकल्प हे मंडळाच्या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य आहे. श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पादुकांच्या दर्शनाची पर्वणी भाविकांना मिळणार आहे. तर, तिस-या दिवशी संतांच्या पादुका दर्शनासाठी मंडपामध्ये आणल्या जाणार आहेत. शिर्डीचे साईबाबा, शेगावचे गजानन महाराज, अक्कलकोट स्वामी, शंकर महाराज, बाळूमामा महाराज, नित्यानंद स्वामी, श्रीपाद श्रीवल्लभ दत्त महाराज, नीम करोली बाबा, प.पू.आनंदऋषीजी म.सा. अशा नऊ ते दहा संत महात्म्यांच्या पादुका दर्शनासाठी ठेवल्या जाणार आहेत. महापुरुष आणि संतांच्या पादुकांचा संगम असलेला हा आगळा धार्मिक कार्यक्रम आहे. सलग ७ दिवस त्या दर्शनासाठी उत्सव मंडपात ठेवण्यात येणार आहेत. वासापूजन कार्यक्रम मंगळवार, दि.१२ ऑगस्ट रोजी होणार आहे.

ते पुढे म्हणाले, महाराष्ट्रातील साडेतीनशे किल्ल्यांवरची पवित्र माती दर्शनासाठी ठेवली जाणार आहे. सिंधुदुर्ग किल्ल्यावर शिवाजी महाराजांच्या पायाचा ठसा आहे. त्यावरून केलेल्या पादुका संतांच्या पादुकांसह ठेवल्या जातील. संतांच्या आशीवादनि पुढच्या वर्षभरामध्ये मंदिर उभारण्याचा संकल्प मंडळाकडून पूर्ण करण्यात येणार आहे. संपूर्ण दगडी घडणीतून ते साकारले जाईल. दरवर्षी भव्य देखावे साकारण्याची आमची परंपरा आहे. परंतु यावर्षी अत्यंत आकर्षक मंदिर उभारण्याची सुरुवात होणार आहे.

उत्सव सुरू झाल्यावर तिस-या दिवशी भजन, कीर्तनाच्या पार्श्वभूमीवर पादुकांची मिरवणूक काढली जाणार आहे. सदाशिव पेठेतील ब्राह्मण मंगल कार्यालय, ज्ञान प्रबोधिनी, कुमठेकर रस्ता, ट्रेनिंग कॉलेज ते छत्रपती राजाराम मंडळापर्यंत मिरवणूक काढली जाणार आहे. यामध्ये शेकडो भाविक सहभागी होतात.

छत्रपती राजाराम महाराज मंडळाची स्थापना १८९२ मध्ये झाली. देशातील पहिला सार्वजनिक गणेशोत्सव सुरु करणाट्या श्रीमंत भाऊसाहेब रंगारी यांनी या मंडळाची मूर्ती तयार केली होती. रात्री १० नंतर स्पिकर्स बंदी झाल्यामुळे उत्सवात देशातील विविध मंदिराच्या प्रतिकृती उभारण्याची संकल्पना मंडळाने आणली. यामुळे २४ तास श्रीं चे दर्शन घेत उत्सवाचा आनंद भक्तांना घेता आला. याशिवाय गणेशोत्सवात महिलांसाठी हिरकणी कशी सुरु केला, त्याचे इतर अनेक देवस्थाने व मंडळांनी अनुकरण केले. रुग्णवाहिका सेवा, रुग्णसेवा विभाग उत्सवात मंडळातर्फे सुरु करण्यात आला.

## कॅनलवरील पुलाची पाहणी



- **रेलिंग, जाळी बसविणे व रुंदीकरणासाठी अनिताताई इंगळे यांचा पुढाकार**

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

नागरिकांच्या मागणीनुसार व सुरक्षिततेच्या दृष्टीने माजी जि.प. सदस्या मा.सौ. अनिताताई तुकारामशेठ इंगळे यांच्या विशेष प्रयत्नातून खडकवासला स्मशानभूमी शेजारील नांदेड सिटीकडे जाणाऱ्या पुलावर रेलिंग व जाळ्या बसविणे तसेच खडकवासला कॅनलवरील पूल रुंद करण्यासाठी पुणे महापालिकेच्या अधिकाऱ्यांकडून पाहणी करण्यात आली. पूल अरुंद व मजबूत रेलिंग नसल्याने अपघाताचा धोका कायम असल्याची तक्रार नागरिकांनी वारंवार केली होती. याशिवाय वाहतुकीची कोंडी आणि पादचाऱ्यांना होणारा त्रास लक्षात घेता पूल रुंद करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. पाहणीदरम्यान महापालिकेच्या अभियंत्यांनी पुलाची सद्यस्थिती तपासून तांत्रिक बाबींची नोंद घेतली. अनिताताई इंगळे म्हणाल्या, "नागरिकांची सुरक्षा ही आपली प्रथम जबाबदारी आहे. रेलिंग व जाळ्या बसविल्याने अपघातांना आळा बसेल आणि रुंदीकरणामुळे वाहतूक सुरळीत होईल." स्थानिक नागरिकांनी या पुढाकाराचे स्वागत करत महापालिकेने तातडीने काम सुरू करण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. या निर्णयामुळे परिसरातील सुरक्षितता, वाहतुकीची सुलभता आणि पादचारी सुविधा यात लक्षणीय सुधारणा होण्याची शक्यता आहे.

## सचिन महाराज पवार यांना केशव सन्मान पुरस्कार

**महेश वरवटे**

- **केशव शंखनाद पथक ९ वा वर्धापन दिन आणि केशव सन्मान पुरस्कार प्रदान सोहळा**
- **संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे आणि किशोर चव्हाण यांची उपस्थिती**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

केशव शंखनाद पथकाच्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त केशव सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. संत साहित्याचे युवा अभ्यासक आणि ख्यातनाम वक्ते ह.भ.प. सचिन महाराज पवार यांना केशव सन्मान पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. रविवार दिनांक १७ ऑगस्ट रोजी सायंकाळी ५ वाजता सदाशिव पेठेतील भावे प्राथमिक शाळेच्या सभागृहात पुरस्कार वितरण समारंभ होणार आहे, अशी माहिती केशव शंखनाद पथकाचे अध्यक्ष नितीन महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पत्रकार परिषदेला केशव शंखनाद पथकाचे संस्थापक अध्यक्ष नितीन महाजन, सचिव रणजित हगवणे, व्यवस्थापक काळूराम डोमाळे यांसह पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संतसाहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे हे असणार आहेत. तर, विश्व हिंदू परिषदेचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत मंत्री किशोर चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. समाजात संघटितपणे आणि समर्पित वृत्तीने धार्मिक काम करणा-या व्यक्तीला केशव शंखनाद पथक पुरस्कार देण्यात येतो. सचिन महाराज पवार यांनी कीर्तनाच्या माध्यमातून संतांची शिकवण आणि संत परंपरा जनसामान्यात रुजविण्याचे काम केले आहे. त्यामुळे त्यांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. सन्मान चिन्ह, सन्मान पत्र, व ११०००/- रुपयाचा धनादेश असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

नितीन महाजन म्हणाले, हिंदुस्थानातील पहिले आणि एकमेव शंख वादकांचे केशव शंखनाद पथक आहे. गणेशोत्सवात शंखनाद करण्याच्या उद्देशाने २०१७ मध्ये शंखनाद पथकाचा सराव ओंकारेश्वर मंदिराता सुरू झाला. त्यावेळी संख्या अगदीच कमी होती. आम्ही शंखनादाविषयी मार्गदर्शन करित आणि आरोग्याच्या दृष्टीने फायदे सांगून लोकांमध्ये जनजागृती केली. त्यानंतर शंख वादकांच्या संख्येत मोठी वाढ झाली. धार्मिक पौराणिक वाद्यांचे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व आहे त्याचा प्रसारक करण्याच्या उद्देशाने संस्थेच्या वतीने मोफत शंख वादन प्रशिक्षण वर्ग देखील सुरू झाले, त्यालाही चांगला प्रतिसाद मिळत आहे.

## ॲड. प्रसन्नदादा जगताप यांचा महिलांसाठी खास उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

श्रावण महिना म्हटलं की भक्ती, अध्यात्म आणि धार्मिक उत्साहाने भरलेला काळ. या पार्श्वभूमीवर हिंगणे परिसर व प्रभाग क्रमांक ३४ मधील महिलांसाठी एक विशेष धार्मिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप व मित्र परिवाराच्या वतीने १४ ऑगस्ट, गुरुवारी ही सहल आयोजित करण्यात आली आहे.

या एकदिवसीय सहलीत सहभागी महिलांना नारायणपूर येथील प्रसिद्ध श्री दत्त मंदिर, बोपदेव गावातील श्री कानिफनाथ मंदिर आणि सासवड येथील संत सोपानदेव समाधी मंदिर येथे जाऊन



दर्शन घेण्याची संधी मिळणार आहे. धार्मिक वातावरणात, समूहाने, हरिनामाच्या गजरात होणारी ही सहल महिलांसाठी अध्यात्मिक उर्जा आणि मनःशांती देणारी ठरणार आहे.

या सहलीत सहभागी होण्यासाठी हिंगणे परिसर, माणिकबाग, सनसिटी रोड, महादेव नगर, आनंदविहार, विश्रांतीनगर या भागातील महिलांना प्राधान्य दिले जाणार आहे. नावनोंदणी करताना पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, आधार कार्डाची झेरॉक्स आणि दोन आयकार्ड साईज फोटो आवश्यक असून, पुढील तीन दिवसांत सकाळी ११ ते संध्याकाळी ६ या वेळेत हिंगणे चौकातील ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या संपर्क कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहून नोंदणी करावी.

या सहलीत धार्मिक प्रवचन, भजन, कीर्तन तसेच महिलांच्या मनोरंजनासाठी हलक्या-फुलक्या खेळांचे आयोजनही करण्यात येणार आहे. सहलीदरम्यान भोजन आणि अल्पोपहाराची सोय आयोजकांच्या वतीने केली जाणार आहे.

> **"श्रावण महिना हा धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या महत्त्वाचा असतो. या निमित्ताने महिलांना मंदिरदर्शन आणि एकमेकांशी संवाद साधण्याची संधी मिळावी, तसेच भक्तीमय वातावरणाचा अनुभव घ्यावा, हा या उपक्रमामागील उद्देश आहे,"**
> **- ॲड. प्रसन्नदादा जगताप**
> **माजी उपमहापौर**

## बालगोपाळ फोडणार अभिनव सायकल दहीहंडी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जेधे सोशल वेल्फेअर फाऊंडेशन आणि इंद्राणी बालन फाऊंडेशन यांच्या वतीने यंदाही अभिनव बालगोपाळ सायकल दहीहंडीचे आयोजन केले आहे. येत्या शनिवारी (ता. १६) सकाळी ११.३० वाजता जेधे मॅन्शन, पंचमुखी मारुती मंदिराजवळ, शुक्रवार पेठ, पुणे येथे ही दहीहंडी बालगोपाळांच्या हस्ते फोडण्यात येणार आहे. या सायकल दहीहंडीमध्ये २०० सायकल आहेत. दहीहंडी फोडल्यानंतर अतिदुर्गम भागातील १००, तर शहराच्या मध्यवस्तीतील १०० गरजू विद्यार्थ्यांना या सायकलींचे मोफत वाटप करण्यात येणार आहे. बालगोपाळ सायकल दहीहंडीच्या माध्यमातून गरजू बालगोपाळांच्या जीवनात आनंदाचे क्षण भरविण्याचा या उपक्रमाचा हेतू आहे, अशी माहिती उपक्रमाचे आयोजक पुनितदादा बालन आणि कान्होजी दयानंद जेधे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे. कान्होजी जेधे म्हणाले, "जेधे सोशल वेल्फेअर फाउंडेशन आणि इंद्राणी बालन फाऊंडेशनच्या माध्यमातून दरवर्षी अभिनव पद्धतीने दहीहंडी साजरी केली जाते. याआधी सायकल दहीहंडी, खेळण्यांची दहीहंडी आयोजित केली होती.

# आता ३१ ऑक्टोबरपर्यंत सवलतीच्या दरात पाहता येणार शिवसृष्टी

## अभय भुतडा फाऊंडेशनतर्फे शिवसृष्टीला ७५ लाखांची देणगी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

दि. ११ ऑगस्ट, २०२५ १५ मे पासून मागील तीन महिन्यात शिवसृष्टीला तब्बल दीड लाखाहून अधिक शिवप्रेमीनी भेट दिल्याच्या पाश्वभूमीवर ही सवलत आणखी वाढवावी या जनभावनेचा आदर करीत पुढील ३१ ऑक्टोबरपर्यंत रुपये ७५ इतक्या नाममात्र दरात नागरिकांना शिवसृष्टी पाहता येणार असल्याची घोषणा आज आयोजित पत्रकार परिषदेत महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानचे विश्वस्त व शिवसृष्टी प्रकल्पाचे अध्यक्ष जगदीश कदम यांनी केली.

पुण्यातील अभय भुतडा फाऊंडेशनच्या वतीने यासाठी ७५ लाखांची देणगी दिल्याची माहितीही यावेळी कदम यांनी दिली. अभय भुतडा फाउंडेशनचे अभय भुतडा, शिवसृष्टी प्रकल्पाचे विश्वस्त अमृत पुरंदरे, सुनील मुतालिक, विनीत कुबेर, प्रकल्पाचे सल्लागार मनोज पोचट, प्रशासकीय अधिकारी अनिल पवार यावेळी उपस्थित होते.

याविषयी अधिक माहिती देताना जगदीश कदम म्हणाले "कै. पद्मविभूषण शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या आणि महाराजा शिवछत्रपती प्रतिष्ठानच्या वतीने उभारण्यात येत असलेल्या शिवसृष्टीचे दोन टप्पे आता पूर्ण झालेजास्तीत जास्त शिवप्रेमींना शिवचरित्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा जाज्वल्य इतिहास माहिती व्हावा, यासाठी काहीतरी ठोस कृती करण्याची फाऊंडेशनची इच्छा होती. आणि त्यातूनच ही कल्पना पुढे आली आणि प्रतिष्ठानने देखील त्याला अनुमोदन दिले. आता सवलतीच्या दरात जास्तीत जास्त नागरिकांना महाराजांचा इतिहास, त्यांचा संघर्ष, त्यांनी पाहिलेली स्वराज्याची स्वप्ने, त्यांची दूरदृष्टी, त्यांची राज्यपद्धती अनुभविता येईल. यासोबतच त्यांच्या स्वराज्य, स्वभाष व स्वधर्म या विचारांचा प्रचार व प्रसार सर्वत्र होईल असा विश्वास यावेळी अभय भुतडा यांनी व्यक्त केला.

सदर सवलत लागू होण्याआधी शिवसृष्टी पाहण्यासाठी असलेल्या तिकीटाची किंमत ही प्रौढांसाठी प्रत्येकी रु. ६०० तर १६ वर्षांखालील मुलांसाठी प्रत्येकी रु. ३०० इतकी होती. अभय भुतडा यांनी दिलेल्या देणगीमुळे ही तिकीटाची किंमत आता मर्यादित कालावधीसाठी नाममात्र ७५ रुपये असेल.

पुण्याजवळील आंबेगाव, बुद्रुक, पुणे ४११ ०४६ येथे तब्बल २१ एकर परिसरात उभारलेली शिवसृष्टी यानिमिताने जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचेल. राज्यातील विविध भागातून आपापल्या कुटुंबातील लहाने मुले व तरुणांना नागरिक शिवसृष्टी दाखविण्यास घेऊन येतील. आपल्या द्रष्ट्या व जाणता राजाचे व्यक्तिमत्व नव्या पिढीपर्यंत पोहोचवता येईल, आपल्या इतिहासासोबतच नीतीमूल्ये आणि कर्तव्यांची जाणीव नव्या पिढीला होऊन एक सशक्त समाज तयार होण्यासाठी मदत होईल, असा आशावादही यावेळी जगदीश कदम यांनी व्यक्त केला.



नुकतेच फेब्रुवारी महिन्यात शिवजयंतीचे औचित्य साधत शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले.

या टप्प्याचे एक मुख्य आकर्षण म्हणजे विशेष असे टाईम मशीन थिएटर. हे थिएटर शिवप्रेमींसाठी एक पर्वणी ठरत असून यामधील कालकुपीत बसून आपण सुमारे काही हजार वर्षे मागे जातो व तेथून शिवाजी महाराजांचा काळ दृक श्राव्य पद्धतीने अनुभवितो. यामध्ये महाराजांशी संबंधित कथा या आधुनिक तंत्रज्ञानाचा माध्यमातून शिवप्रेमीना अनुभवता येतात.

यासाठी मॅपिंग, होलोग्राफी, फिजिकल इफेक्ट्स व सर्वात महत्वाचे म्हणजे ३६० अंशामध्ये फिरणारे रोटेटिंग अर्थात फिरते थिएटर यांचा प्रामुख्याने अनुभव घेता येणार असून या कालकुपीच्या थिएटरमध्ये एका वेळी १०० व्यक्ती विशेष अशा ३६ मिनिटांच्या शोचा अनुभव घेऊ शकतात.

याशिवाय शिवसृष्टीमधील दुर्गवैभव', 'रणांगण' ही दालने, महाराजांच्या आग्राहून सुटकेचा थरार उभा करणारे दालन, प्रत्यक्ष शिवराय आपल्याशी संवाद साधत असल्याचा अनुभव देणारे 'श्रीमंत योगी' हे दालन, राज्याभिषेकाचा देखावा असलेला 'सिंहासनाधिश्वर' हे दालन, महाराजांच्या काळात काढलेल्या व सध्या जगातील प्रसिदध संग्रहालयांमध्ये असलेल्या महाराजांच्या चित्रांच्या (पेंटिंग्ज) हाय रेझोल्यूशन इमेजेसच्या प्रिंटस, छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या लढायांची माहिती देणारे दालन, प्रतापगडावर असलेल्या तुळजा भवानी मातेच्या मंदिराची प्रतिकृती आणि गंगासागर तलाव आदींना भेट देत शिवकाळाचा प्रत्यक्ष अनुभवच शिवप्रेमींना घेता येणार आहे

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.